# त्रिवेणी म्हणी भाषेची लेणी

सौ. सुहासिनी ताम्हणकर

# परिचय

**सौ. सुहासिनी  ताम्हनकर** या मुळच्या विदर्भातल्या आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्वाला विविध पैलू आहेत. शाळेपासून हुशार विद्यार्थिनी असल्या तरी खेळात त्यांना विशेष रस होता. राष्ट्रीय स्तरावरील आंतरशालेय स्पर्धेत उंच उडीत त्यांनी सुवर्णपदक मिळवले आहे. एम. ए. पर्यंतच्या शिक्षणानंतर त्यांचे श्री. श्याम गोपाळ ताम्हनकर M.E. D.B.M. G.D. Arch D.I.E. F.I.E. मराठीतून लेखन कथाकथन काव्यवाचन करणाऱ्या अशा अष्टपैलू व्यक्तीशी लग्न झाले. विवाहानंतर त्या मुंबईत स्थायिक झाल्या.

जात्याच असणाऱ्या गाण्याच्या आवडीमुळे रेडिओ व दूरदर्शनवरील भजनाच्या व वनिता मंडळ या कार्यक्रमात भाग घेऊ लागल्या. काही कथा, श्रुतिका यांचे लेखन व काहीत कामही केले आहे.

फावल्या वेळेचा सदुपयोग व्हावा म्हणून गेली 27-28 वर्षे त्या 10 वी पर्यंतच्या मुलांना हिंदी व मराठी शिकवतात. 10 वी च्या काही पंजाबी व दाक्षिणात्य विद्यार्थ्यांनी 80 क्या वर व एकदोघांनी तर 85-86 मार्क्स मिळवून त्यांच्या शिकवण्याचे सार्थक केले आहे. आणि याच त्यांच्या शिकवण्याच्या अनुभवातून त्यांनी वाचनात येणाऱ्या म्हणी लिहून ठेवण्याच छंद जोपासला. त्या छंदाचे उपयुक्त फळ म्हणजे विद्यार्थी व शिक्षक यांना मार्गदर्शक ठरेल आणि रसिकांना मनोरंजक वाटेल असा "**त्रिवेणी, म्हणी भाषेची लेणी**" हा म्हणींचा संग्रह त्यांनी छापला.

खरतर वाचनाला पर्याय नाहीच. परंतु, सध्याच्या तंत्रज्ञानामुळे अनेक गोष्टी सुलभरीत्या उपलब्ध होत आहेत. यातील एक गोष्ट म्हणजे इंटरनेट. या नेटद्वारे आपण जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचू शकतो. त्यामुळे हे पुस्तक या संकेतस्थळावर उपलब्ध करून देत आहेत. तसेच नेत्रहीनांनाही याचा फायदा व्हावा यासाठी या पुस्तकाचे ब्रेल लिपीत रूपांतर करण्याचा तसेच National Association For Blind (N.A.B.) या संस्थेच्या सहकार्याने या पुस्तकाचे Talking Book करण्याचा प्रयत्न आहे. यथावकाश हेही काम पूर्ण होईल.

म्हणी हे आपलं सांस्कृतिक धन आहे. ते जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोहोचावं यासाठी ही सर्व धडपड आहे. परमेशवर या कार्यात त्यांना सफलता देवो ही इच्छा.

सौ. अवंती महाजन

**सौ. सुहासिनी  ताम्हनकर** यांनी "**त्रिवेणी, म्हणी भाषेची लेणी**" हा मराठी म्हणींचा संग्रह **www. marathipustake.org** या संकेतस्थळाला उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे मनपूर्वक धन्यवाद. म्हणी हे आपलं सांस्कृतिक धन आहे. ते जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोहोचावं यासाठी ही सर्व धडपड आहे. आणि यासाठी त्यांनी केलेली मदत खरोखरच अभूतपूर्व आहे. तरी हे धन जास्तीतजास्त समृध्द व्हावं यासाठी आपल्याही मदतीची आणि सहकार्याची अपेक्षा आहे. वाचकोहो, आपली मराठी भाषा अत्यंत समृध्द तशीच विविधंगी आहे. कोकणी, वऱ्हाडी, आगरी इ. अशा अनेक वेगळ्या ठेवणींचा त्यात समावेश आहे. आणि त्यामध्येही अनेक म्हणींचा खजिना दडलेला आहे. तरी आपल्या सहकार्याने हा खजिना जास्तीतजास्त वाचंकापर्यंत पोहोचावा यासाठी हा प्रयत्न आहे. आपणांस माहीत असलेल्या आणि या संकेतस्थळावर उपलब्ध नसलेल्या म्हणींचा खजिना आम्हांस ई-मेल द्वारा पाठवावा ही विनंती. जेणेकरून आपल्या सर्वांच्या प्रयत्नातून म्हणींचा कोष निर्माण होण्यास मदत होईल

**धन्यवाद!!!!**

# <u>त्रिवेणी</u>

## म्हणी :- विश्वकोश

### <u>अ</u>

अति तेथे माती

अघळ पघळ वेशीला ओघळ

अती सर्वत्र वर्जयेत

अडाण्याचा आला गाडा वाटेवरच्या वेशी मोडा

अती झालं हसू आलं

अती उदार सदा नादार

अती लाड जिभेला नाही हाड

अती ऊ त्याला खाज नाही अती ऋण त्याला लाज नाही

अनुभवाशिवाय शहाणपण येत नाही

अती खाणे मसणात जाणे

अगं अगं बायकू तुझं किती ऐकू

अनुभव जेवढा वृद्ध तेवढा समृद्ध

असेल ते विटवायचं नसेल ते भेटवायचं

अशी रागा भीक मागा, त्याहून रागा, देश त्यागा

असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी

अहंकाराला न थारा तेथे देवाला निवारा

अक्कल ना बक्कल गावभर नक्कल

अरे ला कारे

असून अडचण नसून खोळंबा

अतिथी देवो भव

अगं अगं म्हशी मला कुठं नेशी

अडाणी कुणबी दुप्पट राबे

अवघड जागी दुखणे अन जावई वैद्य

अन्नछत्री जेवणे मिरपूड मागणे

आहेर नारळाचा गजर वाजंत्र्याचा

अरत्र ना परत्र

अति परिचयादवज्ञा

अडला हरी गाढवाचे पाय धरी

अडली गाय फटके खाय

अंथरून पाहून पाय पसरावे

अती शहाणा त्याचा बैल रिकामा

असतील शिते तर जमतील भुते

असंगाशी संग प्राणाशी गाठ

अनंत हस्ते कमलावराने देता किती घेशील दो कराने

अस्तनीतील निखारा

अती घाई मसणात जाई

अत्याशा निराशा

अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणे

अधिकस्य अधिकं फलं

अडला तो पडला

अर्धा वैद्य, मरणास खाद्य

अत्याशा निराशा

अटक्याचा सौदा येरझारा चौदा

अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणे

अर्धे टाकायचे अन सगळ्याला धावायचे

अल्प बुध्दी बहु गर्वी

अन्न तारी अन्न मारी, अन्नासारखा नाही वैरी

अरे माझ्या कर्मा कुठे गेला धर्मा

अन्नाने मारलेला खाली पाही, तलवारीने मारलेला वर पाही

अढीच्यादिढी अन सावकाराची शिडी

अडाण्याची मोळी भलत्यास गिळी

अनोळखी उपारव्या नऊपट होम

अपमानाची पोळी सर्वांग जाळी

अनोळख्याला द्यावी भाकर पण ओसरी देऊ नये

अधाशी, उपाशी, घर नाशी

अती लाड चिंध्या फाड

असं असं नि जगात हसं

अजब गावचा गजब तमाशा

अकलेचे अमीर सांगितल्या मिरच्या आणली कोथंबीर

अडत्या घरी पडत्या गेला, हात हलवीत परत आला

अती राग भीक माग, त्याहून राग देश त्याग, त्याहून राग प्राण त्याग

अकलेचा कांदा रडायचा धंदा

## आ

आपल्या पोळीवर तूप ओढून घेणे

आधी कळस मग पाया

आकारे रंगती चेष्टा

आण मेल्या पायली मी करते बायली

आज रोख उद्या उधार

आधी पोटोबा मग विठोबा

आंधळा मागतो एक डोळा देव देतो दोन

आखुड शिंगी बहुदुधी

आयत्या बिळावर नागोबा

आळशाच्या घरी गंगा

आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास

आळशाला गंगा दूर

आई जेवू घालीना बाप भीक मागू देईना

आपल्या तो बाळ्या दुस-याचं ते कार्ट

आत्याबाईला मिशा असत्या तर काका म्हटलं असतं

आधीच रडवं त्यात माहेरं आडवं

आधीच रडवा त्यात बायको मेली

आधीच मर्कट तशातही मद्य प्याला

आधी लगीन कोंडाण्याचे मग रायबाचे

आडात नाही तर पोहो-यात कुठून येणार

आलं कानावर सोडलं वाऱ्यावर

आले भेटीला धरले वेठीला

आळीमिळी गुपचिळी

आप मेले जग बुडाले

आऊचा काऊ तू माझा भाऊ

आपलं घर नि हागून भर

आडजीभ खाये अन पडजीभ वाट पाहे

आले देवाजीच्या मना तेथे कोणाचे चालेना

आला आकाबाईचा फेरा

आधी आपलं भरा मग देवाचं करा

आभाळाला अस्तर लावायचं कोणी

आधी जाते अक्कल मग जाते लक्ष्मी

आयजीच्या जिवावर बायजी उदार

आपलाच दाम खोटा वाण्याशी का तंटा

आणतो उसनवारी मिरवतो जमादारी

आग रामेश्वरी बंब सोमेश्वरी

आजा मेला नातू झाला

आपलेच दात अन आपलेच ओठ

आवशी नाही तर मावशी

आईचे नाही तर दाईचे दूध

आधी होते थोडे व्याह्याने धाडले घोडे

आभाळाला नाही पार जंगलाला नाही दार

आधी करी सून-सून मगर करी फुण-फ़ुण

आढ्याचं पाणी वळचणीला

आपली पाठ आपल्याला दिसत नाही

आपल्या कानी सात खडे

आंधळ्या बहिऱ्याची गाठ

आठ पुरभय्ये नऊ चौके

आवडत्याचा शेंबूड गोड नावडत्याचं मीठ आळणी

आला चेव केला देव नाहीतर हरहर महादेव

आधी केले मग सांगितले

आपला हात जगन्नाथ

आंधळं दळतंय कुत्रं पीठ खातंय

आधंळ्याच्या गाई देव राखी

आगीतून फुफाट्यात

आधी दिवा घरात तेवा मग मंदिरात ठेवा

आवळा देऊन कोहळा काढणे

आपलं नाक कापून दुसऱ्याला अपशकून

आरोग्य हीच खरी संपत्ती

आरोग्य धन संपदा

आशा सुटेना अन देव भेटेना

आजचं काम उद्यावर ढकलू नये

आग तिथे धूर

आपल्याच पायावर धोंडा पाडून घेणे

आलीया भोगासी असावे सादर

आली अंगावर घेतली शिंगावर

आधी हिंडली वाडेघोडे, आता बसली गंगेपुढे

आपण हसे लोकाला शेंबूड आपल्या नाकाला

आवड तिथे सवड

आधी होता वाघ्या, त्याचा झाला पाग्या

आगीवाचून कढ नाही, मायेवाचून रड नाही

आखाडयात दंगल गावाला चंगळ

आपलीच मोरी मुतायची चोरी

आनंदाच्यावेळी सगेसोयरे, दुःखाच्या वेळी दूरच बरे

आरवा मिरवा भात हिरवा

आधीच आळशी त्यात विटाळशी

आधीच उल्हास त्यात फाल्गुनमास

आधीच हौस त्यात पडला पाऊस

आधी जाते भांडवल मग येते अक्कल

आईची माया पोर जाईल वाया

आधीच रडे तो घोडयावर काय चढे

आतून कीर्तन वरून तमाशा

आली अंगावर घेतली शिंगावर

आरून फिरून बाप नवरा

आईचा डोळा आसवांचा मेळा

## इ,ई

इन मीन साडेतीन

इडा पीडा टळो

इकडे आड तिकडे विहीर

इजा बिजा तिजा

इच्छा तेथे मार्ग

इकडून तिकडून वारलं, मधी मुसळ मारलं

ईश्वराचे देणे माणसाचे लेणे

## उ, ऊ

उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग

उठ रे छंदा नि तेवढाच धंदा

उडाला तर पक्षी बुडाला तर बेडूक

उंटावरून शेळ्या हाकणे

उठता लाथ बसता बुक्की

उघड्या घरी नागडं गेला थंडीनं गारठून मेलं

उत्तम शेती मध्यम व्यापार कनिष्ठ नोकरी

उंटाच्या लग्नात गाढव वाजंत्री

ऊस हागणार किती आणि गोवऱ्या थापणार किती

उडत्या पाखराची पिसं मोजणे

उघड्या डोळ्याने प्राण जात नाही

उपट सूळ नि घे खांद्यावर

उचल पत्रावळी तर म्हणे पाव्हणे किती

उष्टय़ा हातानी कावळा हाकलणार नाही

उडदामाजी काळे गोरे

उधारी करी नादारी

उधारीचा मामला हळूहळू बोंबला

उधारीचे पोते हातभर रिते

उधारीची सुरी दोन दिवस बरी

उथळ पाण्याला खळखळाट फार

उगवत्या सूर्याला नमस्कार

उगवतीला नमस्कार मावळतीला राम राम

उदयोगाचे घरी ऋध्दी सिध्दी पाणी भरी

उंदराला मांजर साक्ष

उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग

उचलली जीभ लावली टाळ्याला

उक्तीपेक्षा कृती श्रेष्ठ

उद्यापेक्षा आज बरा, कालचा दिवस होता खरा

उठवळ बायको अन गबाळ्या नवरा

उडदामाजी काळे गोरे, काय निवडावे निवडणारे

ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा, काय भुललासि वरालीया रंगा

## <u>ए, ऐ</u>

एक ना धड भाराभर चिंध्या

एकादशी दुप्पट खाशी

एकाने आवरायचं दुसऱ्याने पसरायचं

एकादशीच्या घरी शिवरात्र

एकटा जीव सदाशिव

एकाने काढली चट उठले बारा भट

एकीनं घातली सरी दुसरीने बांधली दोरी

एक दांडीला अन एक गांडीला

एक घाव दोन तुकडे

एक गाव बारा भानगडी

एकानं गाय मारली तरी दुसऱ्याने वासरू मारू नये

एकपुती रडते पाचपुती रडते

एकदा कानफट्या नाव पडलं की पडलं

एकाची जळते दाढी त्यावर पेटवी विडी

ऐंशी तिथे पंच्याऐंशी कर ग रांडे पुरणपोळ्या

एका दगडात दोन पक्षी

एका हाताने टाळी वाजत नाही

एका म्यानात दोन तलवारी राहत नाहीत

एक अधिक एक दोन नाही तर अकरा

ऐकावे जनाचे करावे मनाचे

एका माळेचे मणी, ओवायला नाही कुणी

एक कारभारी बारा चौधरी

एकीत बळ दुहीत कळ

एक गेली वेळा वर्षे गेली सोळा

एकादशीची गाठ उपासाशी

ऐट राजाची करणी गुलामाची

## ओ, औ

ओल्याबरोबर सुकंही जळतं

ओठात एक अन पोटात एक

ओळखीचा चोर जीवे न सोडी

ओम चे नाव ठोम

औट घटकेचं राज्य

ओसाड गावात गाढवी सवाष्ण

ओल्या मातीला आकार देता येतो

ओळखीचा चोर जिवाला घोर

ओक तसा लोक हाती धरवत नाही

औषधं जान्हवी तोयं वैद्यो नारायणोहरी

## अं, अः

अंगात नाही करणी नि मला म्हणा तरणी

अंगी नाही दम दारी उभा यम

अंग उघडे डोक्यावर पदर

अंगात नाही बळ, चिमटा घेऊन पळ

अंथरूण पाहून पाय पसरावे

अंगापेक्षा बोंगा जास्त

अंगापेक्षा बोंगा कुठे जातोस सोंगा

अंगात चोळी गावाला आरोळी

## क

कानात आणि डोळ्यात चार बोटांचं अंतर असतं

कोणाची होऊ नये बायको कोणाचा होऊ नये चाकर

कावळ्याच्या शापाने गाय मरत नाही

काळ आला पण वेळ आली नाही

काशीस जावे नित्य वदावे

कितीही झाकले तरी भागाबाइचे कुल्ले उघडेच

करायला गेला गणपती अन झाला मारूती

कुठे ही मारलं तरी कुत्रा पायाने लंगडतो

कंटाळा त्याचा वानोळा

कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ

का गं बाई अशी तर शिकले तुझ्यापाशी

कठीण समय येता कोण कामास येतो

काखेत कळसा गावाला वळसा

काखेला बरणी कुठं गेली हरणी

करशील सेवा तर खाशील मेवा

कर चाकरी खा भाकरी

कोल्हा काकडीला राजी नि कसायला गाय धार्जिणी

कापे गेली भोके राहिली

कधी न घडे ते अवसे पुनवेला घडे

कानामागून आली तिखट झाली

कशात काय अन फाटक्यात पाय

कामावे तो सामावे

कमरेचं सोडून डोक्याला गुंडाळणे

कावळा बसायला अन फांदी मोडायला

करतो कोण भरतो कोण

कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नाही

कुणी गाण्यात तर कुणी बजावण्यात

कुंपणाने शेत खाल्ले

कुसंतानापेक्षा नि:संतान बरे

कुत्र जाणे आणि चामडं जाणे

केल्याने देशाटन पंडीत मैत्री सभेत संचार

मनुजा चातुर्य येतसे फार

कोळशाच्या दलालीत हात काळे

कुडी तशी पुडी

कशास नाही ठिकाण बुधवारचे लग्न

काडी चोर तो पाडी चोर

काडी सोन्याचा गुण काही सवागीचा गुण

कुचेष्टेवाचून प्रतिष्ठा नाही

कुंभाराची सून कधी तरी उकीरड्यावर येईलच

काटे सावरीनं केला मलमलीचा आहेर

कामापुरता मामा ताकापुरते रामायण

काम करायला आली पण खायला मी नि माझी बाळी

कुणाला कशाचं तर बलुत्याला पैशाचं

कुठं जातोस उलगा नशिबाला खाचखळगा

कुठं जातोस भोगा मी तुझ्यापुढं उभा

कोंबडीशिवाय उरूस नाही भानगडीशिवाय पुरूष नाही

कुठे इंद्राचा ऐरावत कुठे शामभटाची तटटाणी

कामाची कुसू नि उदंराची सासू

कुत्र्याचे शेपूट वाकडे ते वाकडेच

कामी न धामी उगी बसा मामी

केळीवर नारळी आणि घर चंद्रमौळी

कोरड्याबरोबर ओले जळते

कापल्या करंगळीवर मुतणार नाही

काचेला तडा गेला की गेला

कावळा तो कावळा कोकिळा ती कोकिळा

कुले धुवून कढी उरलेल्याची वडी

का गं बाई रोड तर म्हणे गावाची ओढ

कावळा कारभारी अन गू दरबारी

कोणाची म्हस अन कोणा उठबस

का ग़ं बाई उगी तर घरात दोघी तिघी

कामाची म्हणून केली, कळशी घेऊन पाण्याला गेली

कोरडी आग पुरवते, ओली आग पुरवणार नाही

काली बाली, सतमाही

करावे तसे भरावे

करील तो भरील

केले तुका झाले माका

कापला तरी आपला तो आपलाच

करा वा मरा

काळासारखं औषध नाही

काटयाने काटा काढणे

काळ कोणाकरता थांबत नाही

कालाय तस्मै नम:

कोळसा किती उगाळला तरी काळा तो काळाच

कडू कारले तुपात तळले, साखरेत घोळले, तरी कडू ते कडूच

काटयाचा नायटा

कधी नरम कधी गरम

काम नाही काडीचं, रिकामपण नाही घडीचं

काम नाही घरी नि सांडून भरी

काळ्या ढगाला सोनेरी किनार असते

करून करून भागले, देवपूजेला लागले

कोंबडं झाकलं तरी तांबडं फुटायचं राहात नाही

कोल्ह्याला द्राक्षे आंबट

काळ्या दगडावरची रेघ

कंदिलापोटी काजळी

कर्म हीच पूजा

काटयाशिवाय गुलाब नाही

केल्याने होत आहे रे, आधी केलेचि पाहिजे

कर नाही त्याला डर कशाला

कावळ्याच्या शापाने गुरे मरत नाहीत

कावीळ झालेल्याला सर्व पिवळेच दिसते

केशा जाणे बारा तर येशा जाणे तेरा

कसेल त्याची जमीन

करील ते कारण बांधील ते तोरण

करीन ती पूर्व

कनवटीला नाही पैसा लोकांना म्हणे या बसा

कुडास कान ठेवी ध्यान

काल मेला पितर झाला

करायला गेले काय उलटे झाले पाय

कसायाला गाय धार्जिणी

काडीची अक्कल गावभर दंगल

कधी शिव्या कधी ओव्या

करावी गरिबा घरची द्यावी श्रीमंताकडं

केर डोक्यात फुंकर कानात

केला गुरू तरी सर्व सुरू

कुठे राजा भोज कुठे गंगू तेली

काकडीची चोरी फाशीची शिक्षा

कोकण्या भात बोकण्या

केस काढले म्हणून मढे हलके होत नाही

कोणाला कशाचं बोडकीला केसाचं

काम करायला आली पण खायला मी अन माझी बाळी

## <u>ख</u>

खाईन तर तुपाशी नाहीतर उपाशी

खायला काळ अन भुईला भार

खवट खोबरं नासकं गिऱ्हाईक

खालमुंडी पाताळ धुंडी

खायचे दात वेगळे दाखवायचे दात वेगळे

खिशात न्हाई आना मला पाटील म्हना

खरे कधी बोलू नये खोटे कधी सांगू नये

खादाड खाऊ लांडग्याचा भाऊ

खाऊन माजावे टाकून माजू नये

खायला आधी निजायला मधी कामाला कधीमधी

खाऊ जाणे तो पचवू जाणे

खायचे वांधे श्रीमंतीचे धंदे

खैऱ्याचे झाड नि म्हाताऱ्याचे हाड

खर्चणाऱ्याचे खर्चते कोठावळ्याचे पोट दुखते

खाजवून खरूज काढणे

खिळ्यासाठी नाल गेला, नालासाठी घोडा गेला, घोड्यासाठी स्वार गेला, एवढा अनर्थ खिळ्याने केला

खाता खाता खत केलं, कर्जामध्ये शेतं गेलं

खावे, प्यावे, ल्यावे हिशेब विठ्ठलाच्या नावे

खोट्याच्या कपाळी गोटा

खाई त्याला खवखवे

खाण तशी माती, कुंभार तशी लोटी

खऱ्याला मरण नाही

खाल्ल्या घरचे वासे मोजणे

खणखण कुदळी मणमण माती

खाणे पिणे नि रिकामे धिंगाणे

खाऊन माकड दिसण्यात लाकूड

खायला फुटाणे खिशात आठ आणे

खाया पिया कुछना गिलास फोडा बाराणा

खायला उडते कामाला दडते

## ग

गाढवाला गुळाची चव काय

गोरी बहात्तर खोड्या चोरी

गोरी गोमटी कपाळ करंटी

गुरूची विद्या गुरूला

गरीब वाणाची माणसं ताणायची

गरज सरो वैद्य मरो

गाजराची पुंगी, वाजली तर वाजली, नाहीतर मोडून खाल्ली

गंगेत घोडं न्हालं

गल्लीतलं कुत्रं गल्लीतच शहाणं असतं

गाढवांचा गोंधळ लाथांचा सुकाळ

गोड घाशी घर नाशी

गाठ पडली ठका ठका

गुण नाही पण वाण लागला

गव्हाणीतला कुत्रा

गाडयाबरोबर नळ्याची यात्रा

गाव करी ते राव न करी

गाव तिथे महारवाडा

गुळाच्या देवाला गुळाचाच नैवेद्य

गोड करून खावं, मऊ करून निजावं

गोडबोल्या ढोपर सोल्या

गाता गळा पिकता मळा

गाढवाने शेत खाल्ल्याचे ना पाप ना पुण्य

गाढवाच्या पाठीवर गुळाची गोण

गावंढ्या गावात गाढवी सवाष्ण

गावचा रांड्या घरचा देशपांडया

गांडीला नाही गू कावळ्याला आमंत्रण

गाव न गाव जळे हनुमान बेंबी चोळे

गळा कापला खोकला गेला

गाठचा एक बाहेरच्या शंभराबरोबर

गणगोतानं भरलं गाव, तहान लागली विहिरीवर धावं

गोष्टी गोष्टी मेला कोष्टी

गोफण गेली तिकडे, गोटा पडला इकडे

गाडयावर नाव, नावेवर गाडा

गुळाला मुंग्या लागतात

गुळावरले मुंगळे

गर्जेल तो पडेल काय, बोलेल तो करेल काय

गर्वाचे घर खाली

गरज ही शोधाची जननी आहे

गाढवापुढे वाचली गीता, कालचा गोंधळ बरा होता

गळ्यात माळा पोटात काळा

गवयाचे पोर तालात रडते

गेलेला शब्द, वेळ आणि सुटलेला बाण परत येत नाही

गरजवंताला अक्क्ल नसते

गोगल गाय अन पोटात पाय

गाढव गेलं अन ब्रम्हचर्यही गेलं

गाढवाला गुळाची चव काय

गोढणीवरच्या गाई शामभट दान देई

गाढवानं मारली लाथ, अन गावासंगट अबोला

गेलेला तीर बोललेला बोल परत येत नाही

गाढवापुढे वाचली गीता, कालचा गोंधळ बरा होता

गाढव मेलं ओझ्यानं, शिंगरू मेलं हेलपाटयानं

गावचा दर्जी त्याची मर्जी

## घ

घोडा मैदान जवळ असणे

घोडा खाई भाडे

घराबाहेर वाघोबा घरात राघोबा

घरघुशी अक्कल नाशी

घोडयाला मलिदा अन धन्याला धत्तुरा

घरात पैका गावात डंका

घरची भाकरी परक्याची चाकरी

घरात उष्टी बाहेर गोष्टी

घारे डोळे पिंगळे पाय झाडावर बसून मुंगळे खाय

घर ना दार देवळी बिऱ्हाड

घर पहावं बांधून लग्न पहावं करून

धंद्याची विद्या येते पण ददाची विद्या गावी नाही

घुसळतीपेक्षा उकळतीचे घरी अधिक

घे सुरी घाल उरी

घरात नाही दमडी म्हणे शालजोडी

घरची ओज अंगण सांगते

घरासारखा गुण सासू तशी सून

घरी असतील तुरी तर संसार करतील पोरी

घोडी मेली ओझ्यानं शिंगरू मेलं हेलपाटयानं

घर मोठयाचं गाडगं भोकाचं

घरच्या देवा शेणगोळे बाहेरच्या देवा गंध टिळे

घाम गाळला तर दाम मिळतो

घरोघरी मातीच्या चुली, सांगत नाही ती बरी

घर फिरलं की घराचे वासे फिरतात

घोडा अडला, भाकरी करपली, फिरवली नाही म्हणून

घडाई पेक्षा मढाई जास्त

घराला नाही कौल रिकामा डौल

घरात राघोबा घराबाहेर वाघोबा

घटकेत तोळा घटकेत मासा

घशाला कोरड घरात ओरड

घडाई पेक्षा मढाई जास्त

घास रे रामा ये माझ्या कामा

घाम गाळला की दाम मिळतो

## <u>च</u>

चोराच्या हातची लंगोटी

चोराच्या उलटया बोंबा

चमत्काराशिवाय नमस्कार नाही

चिंती परा ते येई घरा

चोराची पावलं चोराला ठाऊक

चालनं कुठं अन बडविले भटं

चोर सोडून संन्यासाला सुळी

चित्त नाही थारी मन तीर्थ करी

चोराची आई मुळू मुळू रडे

चोरीचा मामला हळूहळू बोंबला

चोरून पोळी आरडून गुळवणी

चोच आहे तिथे चारा असतोच

चोरांचा बाजार अन मूर्खांचा शेजार

चुकला फकीर मशिदीत

चढेल तो पडेल

चामडी देईन पण दमडी देणार नाही

चोर तो चोर वर शिरजोर

चांभाराच्या देवाला खेटराची पूजा

चणे खावे लोखंडाचे तेव्हा ब्रह्मपदी नाचे

चाचा चोर भतीजा पापी

चोराच्या मनात चांदणे

चोरावर मोर

चकाकते ते सर्व सोने नसते

चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे

चिंता जाळी मनाला, चिता जाळी देहाला

चिंता चितासमान

चोराच्या हाती जामदारखान्याच्या किल्ल्या

चालत्या गाडयाला खीळ बसणे

चिखलात दगड मारला तर शिंतोडे आपल्याच अंगावर उडतात

चार दिवस सुखाचे चार दिवस दु:खाचे

चोराच्या वाटा चोरालाच माहीत

चार जणांची शेती, खापर येई हाती

चोरीचे धन मोरीत

चट्टामट्टा बाळंभट्टा

चणे खावे लोखंडाचे तेव्हा ब्रम्हपदी नाचे

चावट भुंगा घालतो पिंगा

चांदण्यानं सुकती न वाऱ्यानं उडती

चालतील बाध्या तर विचारतील आयाबाया

चित्रगुप्ताहाती स्वर्गनरकाची खाती

चोरून पोळी बोंबलून तूप

चुकतो तो शिकतो

## छ

छडी लागे छम छम विद्या येई घम घम

छत्तीसचा आकडा

# <u>ज</u>

जिवाचे रान करणे

ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी

जाशील बुधी तर येशील कधी

जातीसाठी खावी माती

जात्यातले रडतात सुपातले हसतात

जोडयानं हाणा पण पाटील म्हणा

जिवावर आलं बोटावर निभावलं

ज्याचं याड त्याला ग्वाड

जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उध्दरी

जाळावाचून कढ नाही मायेवाचून रड नाही

जावई माझा भला अन मुलगा बाईलबुध्या झाला

जेठ पाण्याची भेट

ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या बाभळी

जप एकीकडे कान दुसरीकडे

जळी स्थळी काष्ठी पाषाणी

जास्त बोलायची नाही वाट भुलायची नाही

जागेल तो जगेल

जया अंगी मोठेपणा तया यातना कठिण

जानवं घातलं म्हणून ब्राम्हण होत नाही, माळ घातली म्हणून साधू होत नाही

जिच्या घरी ताक तिचे वर नाक

जावई नाही तर जावयाचा भाऊ

जावयाचं पोर हरामखोर

जी न आवडे वरा ती न आवडे पारोशा केरा

जळते घर भाडयाने कोण घेणार

जे पिंडी ते ब्रम्हांडी

जा रे नवऱ्या घरी मी येते मंगळवारी

जन्मा आला हेला पाणी वाहता मेला

जाईल तेथे हत्ती नाही तेथे मुंगीसुद्धा जाणार नाही

जनी जनार्दन

ज्याचे कुडे त्याचे पुढे

जात कैकाड्याची मिजास बादशहाची

जिथं फुलं वेचली तिथं गोवऱ्या वेचू नयेत

जवळचे असे ते कोपऱ्यात बसे अन दूरचे स्वप्नी दिसे

जावा जावा उभा दावा

जात्यावर बसलं की ओवी सुचते

जिकडे पोळी तिकडे गोंडा घोळी

जोवरी न देखे पंचानना तोवरी जंबुक करी गर्जना

जावई नव्हे मुलीचा नवरा वडील नव्हे आईचा नवरा

ज्या गावाला जायचं नाही त्याची उठाठेव कशाला

जाई मोगरा एक करा, बिलाई धोतरा दूर करा

जशास तसे

ज्याच्या हाती ससा तो पाधरी

ज्याचं करावं भलं तो म्हणतो माझचं खरं

जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही

ज्याला लागली हागाला तो न भी वाघाला

जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे

ज्याचे जळे त्याला कळे

ज्याच्या पोटात दुखतं तेच ओवा मागतं

ज्याच्या हातात आणा तो शहाणा

ज्याची मालमत्ता तो घराचा कर्ता

जेवढी दक्षिणा तेवढी प्रदक्षिणा

जोवरी पैसा तोवरी बैसा

जो गुण बाळा तो जन्मकाळा

जळात राहून माशाशी वैर

जातीच्या सुंदरा काहीही शोभते

जन सुखाचे सोबती

जुनं ते सोनं

जगा आणि जगू द्या

जो दुसऱ्यावरी विसंबला त्याचा कार्यभाग बुडाला

ज्याचा कोंडा त्याचा घोडा

जिवंतपणी लाथा मेल्यावर बाता

जशी राहणी तशी विचारसरणी

जगाला थोर आईला पोर

जावयाचं पोर हरामखोर

जी आवडे वरा ती आवडे घरा

जिथे गाय तिथे वासरू, जिथे माय तिथे लेकरू

जिकडं पुढा तिकडं मुलुख थोडा

जोखड खांद्यावर नि बघतोस बांधावर

ज्याची खावी भाकरी, त्याची करावी चाकरी

ज्या ताटात जेवला, त्याच ताटात हगला

## झ

झाकली मूठ सव्वा लाखाची

झटपट रंगारी

झारीतील शुक्राचार्य

झालं गेलं गंगेला मिळालं

झालं गेलं गंगेला मिळालं

झालं नाही पानी तर तोंड चिमणीवानी

## <u>ट, ठ, ड, ढ</u>

टाच लागली की आच कळते

टिटवी ने समुद्र आटवला

टाकीचे घाव सोशल्याशिवाय देवपण येत नाही

टाकणं टाकलं म्हणून जाणं आलं

ठणठणपाळ जयगोपाळ

ठेव कुणाची देव कुणाला

ठेविले अनंते तैसेची रहावे

ठकास महा ठक

ठोशास ठोसा

डुकराची मुसंडी जाईल तिकडे जाईल

डोळ्यात केर कानात फुंकर

डाव्या हातचा मळ

डोंगर पोखरून उंदीर

डोळा तर फुटू नये आणि काडीही मोडू नये

ढोंग धत्तुरा हाती कटोरा

ढोलक्यास दोन्हीकडून थपडा

ढवळ्याशेजारी पवळा बांधला वाण नाही पण गुण लागला

ढोर मेहनत जेवणाला लज्जत

## त

तोंडापुढे ओव्या पाठीमागे शिव्या

तुझं ते माझं माझं ते माझंच

तुझं माझं जमेना तुझ्यावाचून करमेना

ताव आहे तर आव आहे

तीन दिवस पावणा चौथ्या दिवशी रावणा

तीन तेरा नऊ बारा

तूप खाऊन रूप येत नाही

तिसरं आणि विसरं

तोंड दाबून बुक्क्याचा मार

ताकाला जाऊन भांडे लपविणे

तीन पावलं पुढे चार पावलं मागे

तीन त्रिदल काम सफल

ताकास तूर न लागू देणे

ते ही तो दिवसा गताः

तहान लागल्यावर विहीर खोदणे

तेरडयाचा रंग तीन दिवस

तळ लावी कळ

तेलणीवर रूसली अंधारात बसली

तळं राखील तो पाणी चाखील

ताळ ना तंत्र

तू मारल्यासारखं कर, मी रडल्यासारखं करतो

तेलवाला रडतो म्हणून नारळवाला रडतो

तोरणवेळ आणि मरणवेळ चुकवू नये

ता वरून ताकभात

तोंड करी बाता ढुंगण खाई लाथा

तुम्ही आम्ही एक कंठाळीला मेख

तुला फें तुझ्या बापाला फें

तुझ्या बापाची पेंड

तो पाप देणार नाही तर पुण्य कोठून देणार

तोबऱ्याला पुढे लगामाला मागे

ताटात काय वाटीत काय

ताटावरून पाटावर पाटावरून ताटावर

तीथ आहे तर भट नाही भट आहे तर तीथ नाही

तुला नाही मला नाही घाल कुत्र्याला

तोंड वाकडे पण दैव फाकडे

तोंडात तीळ भिजत नाही

तलवार पाजळली म्हातारीवर गाजवली

तोंड नाही तोबरा, पोट नाही नगारा

तू द्ळ माझे, मी दळतो पाटलाचे

तुमचे डोळे ते आमचे जावई

ताकापुरती आजी कामापुरता मामा

तोंडावर गोड पाठीवर विषाची फोड

तीन तिघाडा काम बिघाडा

तेल गेलं तूप गेलं हाती धुपाटणं आलं

तापल्या तव्यावर पोळी भाजणे

तुरंत दान महापुण्य

तुला न मला घाल कुत्र्याला

तरणी झाली मरणी म्हातारी झाली हरणी

तरण्याचं झालं कोळसं म्हाताऱ्याला आलं बाळसं

तरूणपणी आलं झुलं म्हातारपणी शेंडीला फुलं

ता वरून ताकभात

तान्हेली गाय, चिखल खाय

तण खाई धन

तिखटमीठ कर नीट

तुमी तशा आमी, नीट बसा मामी

## थ

थोराघरचे श्वान त्याला सर्व देती मान

थोराचे दुखणे रातभर कुथणे

थोडक्यात गोडी फारात लबाडी

थोडी तेथे गोडी

थेंबे थेंबे तळे साचे

थांबला तो संपला

## द

दगडापेक्षा वीट मऊ

दात आहेत तर चणे नाहीत चणे आहेत तर दात नाहीत

दात कोरून पोट भरत नाही

दात पडल्यावर नागीण नाही, डोळे फुटल्यावर वाघीण नाही

दिवस बुडाला मजूर उडाला

दुधाने मरणार त्याला विष का पाजावे

देखल्या देवा दंडवत

दिसेल त्याशी हसेल

दाम तसे काम

दैव देतं कर्म नेतं

देखणी बायको दुसऱ्याची

देह देवळात चित्त खेटसत

दुधाची तहान ताकावर

दारचे अंगण घराचा आरसा

दिवाळी दसरा हातपाय पसरा

दुभत्या गाईच्या लाथा गोड

दे माय धरणी ठाय

दुखऱ्या दाताला जीभ लावायची नाही

देव तारी त्याला कोण मारी

दिवसभर चरते एकादशी करते

देणाऱ्याचे हात वर

देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे

दिलं दान घेतलं दान पुढच्या जन्मी मुसलमान

दोन डोळे शेजारी भेट नाही संसारी

दया क्षमा शांती तेथे देवाची वसती

दिव्यात वात डोळ्यात हात

दोन्ही बाजू खांब मधे देवाचा राम

देरे वाण्या खा रे प्राण्या

दुर्जनं प्रथमं वंदे

देणं नास्ति घेणं नास्ति

देव देतो बडवा नेतो

दिवस जातो बोल उरतो

देव नाही देव्हारी धुपाटणं उडया मारी

दोन्ही घरचा पाहुणा उपाशी

दोन डगरीवर पाय ठेवणे

देव तारी त्याला कोण मारी

दिव्याखाली अंधार

दाम करी काम बिबी करी सलाम

दुभत्या गाईच्या लाथा गोड

देणावळ तशी धुणावळ

दोन डगरींवर हात ठेवणे

दही खाऊ मही खाऊ

दगडाला पाझर फुटत नाही

दुधाने तोंड पोळलं तर ताक फुंकून घ्यावं

दुधात साखर

दुग्ध शर्करा योग

देवाची करणी नारळात पाणी

देश तसा वेश नि उलटं लुगडं नेस

दोघांचे भांडण तिसऱ्याचा लाभ

दुष्काळात तेरावा महिना

दोघात तिसरा डोळ्यात कचरा

दोघात तिसरा काम विसरा

दोघांची मस्ती तिघांची कुस्ती

देवाच्या काठीला आवाज नसतो

देवाघरी न्याय

दृष्टी आड सृष्टी

दुसऱ्याच्या डोळ्यातील कुसळ दिसते पण आपल्या डोळ्यातील मुसळ

नाही दिसत

दुसऱ्या सांगे ब्रम्हज्ञान आपण कोरडे पाषाण

दुरून डोंगर साजरे जवळ जाता दरेखोरे

दिसतं तसं नसतं म्हणून जग फसतं

दगडाच्या देवाला खेटराची पूजा

दमडीची कोंबडी चार आण्याचा मसाला

दिसायला भोळा, मुद्दलावर डोळा

दमडीची खरेदी खंडीचा भाव

दमडीचा सौदा येरझऱ्या चौदा

दाट पेरा तर फक्त चारा

दादला फुगला तसाच निजला

दादला झाला गोसावी पोरं कोणी पोसावी

दादाभाई नवरोजी, सगळ्यांपुढे हांजी हांजी

दुसऱ्याची कढी धावून धावून वाढी

दुखणं आलं जिवावर, कांदा भाकरी उरावर

दिसायला देखणा पण अकलेत उणा

दिवस गेला रेटारेटी, रात्री कापूस वेची

दिसायला भोळा मुदलावर डोळा

देवा देवा धाव रे नवसाला पाव रे

दैव आलं द्यायला पदर नाही घ्यायला

दोन मांडवांचा वऱ्हाडी उपाशी

## <u>ध</u>

धरलं तर चावतं सोडलं तर पळतं

धट्टी कट्टी गरीबी लुळीपांगळी श्रीमंती

धर्माचे गाई दात का गे नाही

धन्याला धत्तुरा चाकराला मलिदा

धर्म करता कर्म उभं राहिलं

धनाची माया उडत्या पाखराची छाया

धर्माचे गाई दूध का ग नाही

धन साठलं प्रेम दाटलं, धन उडालं प्रेम बुडालं

धर धीर खा खीर

धिटाई खाई मिठाई

धडम धडवा अवसेचा पाडवा

धरम करा अन चावडी चढा

धाव धाव धावले तेव्हा देव पावले

# न

नमनाला घडाभर तेल

नदीचे मूळ आणि ऋषीचे कूळ शोधू नये

नकटं व्हावं पण धाकटं होऊ नये

न कर्त्याचा वार शनिवार

नदीमागून गेले की सागर भेटेल

नवरा मरो नवरी मरो भटाला दक्षिणेशी कर्तव्य

नाकाने कांदे सोलणे

नाक दाबले की तोंड उघडते

नालेसाठी घोडा

नाही निर्मळ जीवन काय करील साबण

निंदकाचे घर असावे शेजारी

नराचा वानर

नेसेन तर शालू नाहीतर तशीच बसेन

न खात्या देवाला गुळाचा नैवद्य

नमस्कार फुकाचा आशीर्वाद लाखाचा

नकटा वडा दिमाख बडा

नावडतीचं मीठ आळणी

नाकापेक्षा मोती जड

नाकावरची माशी न उडणे

न मागे तयाची रमा होय दासी

नशीबाचा ठेवा चुकेना देवा

नवी विटी नवे राज्य

नवऱ्यानं मारलं पावसानं झोडलं तर सांगायचं कुणाला

ना खंत ना खेद

नासले मिरे जोंधळ्याला हात जात नाही

निर्लज्जं सदा सुखी

न देवाय न धर्माय

नव्याचे नऊ दिवस

नवे ते हवे

नाचता येईना अंगण वाकडे

नळी फुंकिली सोनारे इकडून तिकडे गेले वारे

नाण्याला दोन बाजू असतात

नवी विटी नवे राज्य

नकटीच्या लग्नाला हजार विघ्ने

नाव मोठे लक्षण खोटे

नाव सोनूबाई हाती कथिलाचा वाळा

नाव गंगाबाई तहानेने तडफडे

नागेश्वराला नागवून सोमेश्वराला वात लावणे

नशीब सरले भोग उरले

नवरा साधाभोळा बाईल गांजते सासूला

नवरा जातो नवरीसाठी, वऱ्हाड जाते खायासाठी

नाव गंगाबाई तहानेने जीव जाई

नवऱ्याचं पीठ बायकोचं मीठं, तर संसार चालेल नीट

नवऱ्याचं पाहिलं रूप, विसरली तहान भूक

न सुनेचं खरं न सासूचं खोटं

नखाची सर मुखाला नाही

नखरेल मैना गावाची दैना

नवरा केला सुखाला, पैसा नाही कुंकवाला

नात्याची ना गोत्याची जीव लांब पात्याची

नालेसाठी घोडा

नायाघरची उलटी खूण

नखऱ्याची नार गावाला भार

## प

पाण्या तुझा रंग कसा ज्याला जसा हवा तसा

पालथ्या घडयावर पाणी मूर्खाशी कहाणी

पुढच्यास ठेच मागचा शहाणा

प्रथम ग्रासे माक्षिका पातः

प्रेमात आणि लढाईत सर्व क्षम्य असतं

प्रेम आंधळं असतं

पुरूषानं भोगायचं बाईनं सोसायचं

पिकल्याशिवाय विकत नाही

पायाखाली मुंगी मरणार नाही

पडला हस्त शेतकरी मस्त

पडतील स्वाती तर पिकतील मोती

पंत मेले राव चढले

पाह्णुण्याचा पाह्णुणा कोंडिबाचा मेह्णुणा

पोळी पहावी काठात नि बायको पहावी ओठात

पह्लिल्या वरा तूच बरा

पह्लिली बेटी धनाची पेटी

पी हळद नि हो गोरी

पायातली वहाण पायातच बरी

पूर्वेचा सूर्य पश्चिमेला उगवणे

पुढे पाठ मागे सपाट

पिंडी ते ब्रह्मांडी

पेजेसाठी शेज सजवावी लागते

पोळीला आणि चोळीला कोणी कमी नसते

पादऱ्याला पावटयाचं निमित्त

परदुःख शीतल

पाचामुखी परमेश्वर

पायानी मारलेल्या गाठी हाताने सुटत नाहीत

पडत्या फळाची आज्ञा

पाण्यात पडलं की पोहता येतं

पोर ना ढोर जीवाला घोर

पदरी पडलं, पवित्र झालं

पाठीवर मारावं पोटावर मारू नये

पापी जाईल तेथे पाऊलभर पाणी

पुत्र व्हावा ऐसा गुंडा त्याचा तिन्ही लोकी झेंडा

पेल्यातलं वादळ

पोरं काढलं कोणी अन पेढे वाटतो कोण

पाटील बुवा पहा अन तुम्हीच बायको व्हा

पहिले पाढे पंचावन्न

पळता भुई थोडी

पिंडे पिंडे मतिर्भिन्नः

पाटलाला मिळालं डबोलं, गावकऱ्यांचं चांगभलं

पादा पण नांदा

पोटातलं ओठावर

पदरचं खावं पण नजरेचं खाऊ नये

पाचावर धारण बसणे

पाण्याखाली मासा झोपी जातो कसा

पाय धू तर म्हणे तोडे केवढयाचे

पै दक्षिणा लक्ष प्रदक्षिणा

पुराणातली वांगी पुराणात

पुनरपि जननं पुनरपि मरणंम

पुरून घ्या म्हणजे उगवेल

पाल चुकचुकणे

प्रत्येक यशस्वी पुरूषामागे एका स्त्रीचा हात असतो

पोटात एक ओठात एक

पोटचं, पाठचं आणि गाठचं, गाठचं जास्त उपयोगी पडतं

पाठी ना पोटी जिवाची आटापिटी

पिकतं तिथे विकत नाही

पराचा कावळा

पळसाला पाने तीन

पुढच्यास ठेच मागचा शहाणा

पेला लागे ओठा दैव मारी सोटा

प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे

प्रयत्नांती परमेश्वर

पुढच्यास ठेच मागचा शहाणा

पाची बोटे सारखी नसतात

प्रसंगी पावतो तो परमेश्वर

पायाखाली काय जळतंय

पैशापाशी पैसा जातो

पैशाला पैसा ओढतो

पाच गेले पन्नास राहिले

पायाला पडसं नाकाला नारू

पायात आली खोट नीट धर बोट

पंगतीत साडू जेवणात लाडू

पापाची शिदोरी चार दिवस बरी, पाचव्या दिवशी पुन्हा चोरी

पोटी ते ओठी

पाचही बोटे सारखी नसतात

पेजेला दील तो शेजेला घील

पिकं तिथं पाखरं

पाप जिरत नाही पुण्य सरत नाही

पैशाची गरमी घरात काय कमी

पचेल ते खावे रूचेल ते बोलावे

पाठीमागे दमबाजी तोंडपुढे हांजी हांजी

प्रत्येकाने स्वतःचा क्रूस स्वतःच वाहायचा असतो

प्राणांवर आलं बोटावर निभावलं

पैशाला पासरी

पोट फाटे माया सुटे

## फ

फुल ना फुलाची पाकळी

फुलासंगे मातीस वास लागे

फासा पडेल तसा डाव

फिरेल तो चरेल

फुले वेचली तिथे गोवऱ्या वेचू नयेत

फूल लपवले तरी सुगंध लपत नाही

फट म्हणता ब्रह्महत्या

फोडा आणि झोडा

फावडे आपल्याकडे माती ओढे

फुटले जाते तुटले नाते

फूल लपवले तरी सुगंध लपत नाही

फिरत नाही ते चाक कसले

फाटक्याकडे तुटकं गेलं, अन हात हालवीत परत आलं

फाटक्याचं हरवलं तुटक्याचं गावलं

## ब

बोलविता धनी

बारा गावचं पाणी प्यालेली

बोले तैसा चाले त्याची वंदावी पावले

बाजारात तुरी भट भटणीला मारी

बामणाचं काम सा म्हैनं थांब

बाप दाखव नाहीतर श्राध्द कर

बाईचं पहावं सौंदर्य पुरूषाचा पहावा पराक्रम

बाबा वाक्यं प्रमाणम

बोलाची कढी बोलाचा भात नि आरशातली गाठ

बापापरी बाप गेला बोंबलताना हात गेला

बापाला बाप म्हणेना तो चुलत्याला काका म्हणेल

बारभाईंची शेती काय लागेल हाती

बारा झाली लुगडी तरी भागाबाई उघडी

बोलणाऱ्याचे तोंड दिसते करणाऱ्याचे हात दिसत नाहीत

बडे घर पोकळ वासा

बोलणाऱ्याची माती खपते पण न बोलणाऱ्याचे मोती खपत नाहीत

बाळंभट कढी आंबट

बेडूक फुगून बैल होत नाही

बारा पिंपळावरचा मुंजा

बैल गाभण तर म्हणे नववा महिना

बसता लाथ उठता बुक्की

बाप घरघुशी पोर उपाशी

बाप से बेटा सवाई

ब्रह्मचारी सदा सुखी

ब्रह्म तेथे माया बुवा तेथे बाया

बांध नाही शेताला पीक नाही हाताला

बायकोचा भाऊ लोण्याहून मऊ

बायकोपेक्षा मेव्हणी बरी

बाप तसा बेटा

बोलण्यात राघू नि कामाला आग लागू

बुडत्या बोटीवर उंदीर पण राहात नाही

बाबा राम राम दादा राम राम

बुडत्याला काडीचा आधार

बुडत्याचा पाय खोलात

बैल गेला झोपा केला

बांधली तर गठडी सोडली तर काडी काडी

बळी तो कान पिळी

बावळी मुद्रा देवळी निद्रा

बायको वेडी पोर पिसे, जावई मिळाले तेही तसे

बोका रे बोका कुलूप लावून ठोका

बडया बडया बाता कुल्ले खाई लाथा

बळ देईल तो बलवंत

बोलणे फुकाचे ऐकणे लाखाचे

बाई पेजेला अन शेजेला

बाबा गेल्या दशम्या केल्या

बुडाची माती बुडाला प्यारी

बारा महिने तेरा काळ

बापापरी बाप मेला, जाताना बोंबल्या खात गेला

बाहेर झकपक आत भकभक

बोलाची कढी बोलाचा भात, आपल्या हाते जेवे जगन्नाथ

बुवाचे तुरे लाल बाईचे बुरे हाल

## <u>भ</u>

भरवशाच्या म्हशीला टोणगा

भुरटया गाईला माया भारी चाटून चाटून वासरं मारी

भीक नको पण कुत्रा आवर

भीड भिकेची बहीण

भांडयाला भांडं लागणं

भटजीचं जिणं सदा हात पसरणं

भिकाऱ्याला ओकारी

भरल्या पोटी उंबर कडू

भरल्या गाडयाला सुपाचं ओझं

भाव तसा देव

भूक सोसे वासरू दुःख सोसे लेकरू

भरल्या भटा दही करकरते

भित्री भागूबाई चुलीपाशी हागूबाई

भिडे भिडे पोट वाढे

भिकारी तो भिकारी वर शिरजोरी

भुंकणारा कुत्रा चावत नाही

भावीण नाचते म्हणून न्हावीण नाचते

भिजत घोंगडे गळ्यात लोढणे

भांडणाचे तोंड काळे

भिकेची हंडी शिंक्यास चढत नाही

भाडयाचं घर खाली कर

भटाला दिली ओसरी भट हातपाय पसरी

भित्यापाठी ब्रह्मराक्षस

भिंतीला कान असतात

भुकेला कोंडा निजेला धोंडा

भाव तसे पावें

भाव तसा देव

भले ते भले माझ्या वं बले

भोळ्याचे देव सोळा

भर रे पोटा जा रे दिवसा

भोग सरला वैद्य भेटला

## म

मूर्ती लहान कीर्ती महान

मरावे परी कीर्तीरुपे उरावे

मोर नाचतो म्हणून लांडोर नाचते

मेलेलं कोंबडं आगीला भीत नाही

मोड तोड नि सोनाराची जोड

मरणाला रात्र आडवी

माय मरो मावशी जगो

म्हशीची शिंगे म्हशीला जड नसतात

मुलाचे पाय पाळण्यात दिसतात

मनी नाही भाव देवा मला पाव

मी म्हणीन ती पूर्व

माया आंधळी असते

माझे जेवण चुलीत

मागतो माधुकरी करतो दादागिरी

मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही

माय गेली मरून, गोत गेलं सरून

मला पहा अन फुलं वहा

मऊ लागलं म्हणून कोपरानं खणू नये

मोले घातले रडाया, नाही आसू नाही माया

माझा जीव तुझ्यापाशी तुझा जीव दारच्या कुत्र्यापाशी

मारून मुटकून वैद्यबुवा

मातीचे कुल्ले गळू गळू जाय

मातीचे कुल्ले चिटकत नाहीत

मिळतं तो तो चळतं

मस्करीची कुस्करी

मागून पुढून बाप नवरा

मुखाची सर नखाला येत नाही

मिळाले तर हरी ओम, न मिळाले तर राम राम

माझेच घोडे दामटा पुढे

म्हातारी मेल्याचे दुःख नाही काळ सोकावतो

मराठीने केला कानडी भ्रतार

मातीत हात तोंडात भात

मनात मांडे पदरात धोंडे

मृदंगे मुखलेपेन करोति मधुरं ध्वनिम

मनी वसे ते स्वप्नी दिसे

मनाची नाही तर जनाची लाज ठेवावी

माकडाच्या हाती कोलित

मांजराचा खेळ होतो उंदराचा जीव जातो

मातीचे कुल्ले लावून कुणी जाडा होत नाही

मानला तर देव नाही तर दगड

माणूस घासून नि सोने कसून घ्यावे

मिठाई बनवताना नि रांड नहाताना बघू नये

मुकुटाचे वजन तीन मण

मिशा येताना देश देसत नाही

मुंगी होऊन साखर खावी, हत्ती होऊन लाकडे फोडू नयेत

मुंगीला मुताचा पूर

मुलगा असेल तर नातू मिळेल

मोठयाचं सारचं मोठं

म्हाराचं त्वांड नि सा म्हैनं झाड

मन राजा मन प्रजा

मूर्ती तितक्या प्रकृती

मिळमिळीत सौभाग्यापेक्षा ढळढळीत वैधव्य बरे

मन चिंती ते वैरी न चिंती

मुलाचे पाय पाळण्यात दिसतात

म्हातारीला जरीची साडी

महापुरे झाडे जाती तिथे लव्हाळे वाचती

मौन संमती दर्शनम

माकडाच्या हातात माणिक

मांजराच्या गळ्यात घंटा बांधणे

मूले कुठार

मेल्या म्हशीला मणभर दूध

मान सांगावा जनात अपमान ठेवावा मनात

मृगजळामागे धावू नये

महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळे वाचती

मारले रट्टे काढले उट्टे

माझं थोडं तुझं थोडं, नको दामदूस आपलचं घोडं

मार शेजाऱ्या साप, मी मुलाबाळांचा बाप

मनात एक जनात एक

मनाएवढी ग्वाही त्रिभुवनात नाही

माझे घोडे आधी जाऊ द्या पुढे

मानापानाचा अन दीड कानाचा

माता माऊली नवसाला पावली

मायेचा भोवरा गरगर फिरा

माहेरची मैना सासरी राहिना

मिरवता गोंडा बरा, खेळता बाळ बरा

मोरीला बोळा दरवाजा मोकळा

मायेवाचून रड नाही, आगीवाचून कढ नाही

मांजरीचे दात पिल्लाला लागत नाहीत

मागता येईना भीक मास्तरकी शीक

माझा लोभ तुझ्याघरी, तुपानं द्रोण भरी

मघा मघा वरती बघा

## य

ये रे दिवसा भर रे पोटा

ये रे माझ्या मागल्या ताककण्या चांगल्या

येईना जाईना म्हणे माझं नाव मैना

येरा गबाळाचे काम नोहे

याचं दार त्याचं दार बाई माझ्या तोंडात मार

यत्र यत्र वन्ही तत्र तत्र धूम्रः

ये रे कुत्र्या धर माझा पाय

ये रे गोटया पड माझ्या ओटयात

याची टोपी त्याला त्याची टोपी याला

या बोटावरची थुंकी त्या बोटावर

यथा राजा तथा प्रथा

या कानाने ऐकून त्या कानाने सोडून द्यावे

यात्रा केली परोपरीची, भेट नाही देवाची

## र

रांधा वाढा उष्टी काढा

राजा उदार झाला नि हाती भोपळा दिला

रात्र थोडी सोंग फार

रडल्याशिवाय आई पण दूध देत नाही

रामायण ऐकून रामाची सीता कोण

रंगीत वाडा मधी बांधला रेडा

रोग लागला जिवाला नवस केला देवाला

ऋण काढून सण करू नये

ऋषीचं कूळ आणि नदीचं मूळ शोधू नये

राजाची आई भीक मागून खाई

राजा बोले दळ हाले

राजाला दिवाळी काय माहीत

राजाच्या डोक्यावर टांगती तलवार

रीण फिटेल पण हीण फिटत नाही

रिकाम्या देवळावर कावळ्यांची वस्ती

राखशील ओज तर होईल चोज

रडकं पोर आईचं

राजाला दिवाळी राणीला पाडवा

रोज मरे त्याला कोण रडे

राईचा पर्वत

रजाचा गज

रिकामा न्हावी भिंतीला तुंबडया लावी

रामाची सीता कोण

राजा बोले दळ हाले

रडत राऊत घोडयावर बसवणे

राजाची राणी भरते पाणी

राजे विलासी कुत्रे पलंगापाशी

रिकामे मन सैतानाचे घर

रोग मांडीला मलम शेंडीला

रिकामा घडा घसा कोरडा

रात्री खाते तूप सकाळी पाहते रूप

रेडा रूसला पाठीवर कोरडा बसला

राजा गोंधळी प्रजा आंधळी

रावणाची लंका जळे, हनुमान बेंबी चोळे

## <u>ल</u>

लोण्याची सुध्दा सवत चालत नाही

लेकी बोले सुन लागे

लंकेची पार्वती

लुतरी कान कुतरी

लंकेत सोन्याच्या विटा कोणी पाहिल्या

लष्कराच्या भाकरी भाजणे

लेक दिली कसाबाला रडणं आलं नशिबाला

लौकर निजे लौकर उठे, त्याला बुध्दी, धन आरोग्य भेटे

लाडे लाडे झाले वेडे

लाथ मारीन तिथे पाणी काढीन

लग्न केले नाही तरी मांडवाखालून गेलो आहे

लहानपण देगा देवा

लोका सांगे ब्रह्मज्ञान आपण कोरडे पाषाण

लाज नाही मना कोणी काही म्हणा

लागो भागो दिवाळी

लाडंगा आला रे आला

लाख लाख नवसाचं पीक कापसाचं

लावलं बोट अन आलं पोट

लाडानं येडं अन गुणानं बोबडं

लिना लिना नि भिकार चिन्हा

लाथ मारीन तिथं पाणी काढीन

लकडी शिवाय मकडी वळत नाही

लहान तोंडी मोठा घास

लेकाचे घ्यावे लेकीला द्यावे

लाभावे तो लोभावे

लाडं लाडं खाई कुत्र्याची हाडं

लावली राख नि झाली पाक

लंब्या लंब्या बाता कुल्ले खाई लाथा

लागल्या चित्रा भात खाईना कुत्रा

लागल्या मघा नि टकमक बघा

लाख मरो लाखाचा पोशिंदा न मरो

लक्ष्मी ज्याचे घरी, त्याला रोज श्रीखंडपुरी

लाडाची लाडी पेचात पाडी

## व

विंचवाचं बिऱ्हाड पाठीवर

वाणला तितका घाणला

विशी विद्या तिशी धन

वाचाल तर वाचाल

वाह्यलं ते पाणी राह्यलं ते गंगाजळ

वळचणीचं पाणी आढयाला

विनाश काले विपरीत बुध्दी

विटकं नेसावं पण फाटकं नेसू नये

वळलं तर सूत नाही तर भूत

वादे वादे जायते तत्त्व बोधः

वाघ म्हटलं तरी खातो वाघोबा म्हटलं तरी खातो

व्याप तितका संताप

व्यक्ती तितक्या प्रकृती

वर जाईल तो खाली येईल

वळवाचे पाणी वळचणीलाच जाणार

विटले मन नि फुटले मोती सांधणार नाही

वेलीला भोपळे जड होत नाहीत

वेडयाचं सोंग घेऊन पेडगावला जाणे

वर्जादपि कठोराणि मृदुनि कुसुमादपि

वर वर माया ऊपाशी नीज बया

वेळ ना वखत बसला ठोकत

वाऱ्यावर वरात अन दर्यावर हवाला

वासरात लंगडी गाय शहाणी

वेलदोडयाने सर्दी, लवंगेनी उष्णता

वर जाईल तो खाली येईल

वडाची साल पिंपळाला

वडयाचं तेल वांग्यावर

वारा वाहील तशी पाठ फिरवावी

वरातीमागून घोडं

विद्या विनयेन शोभते

व्यक्ती तितक्या प्रकृती

वेश बावळा परी अंतरी नाना कळा

वाहिली ती गंगा राहिलं ते तीर्थ

विळ्या भोपळ्याचं सख्य

वंशाचा दिवा घरभर हवा

विधवेला कशाला कुंकवाची उठाठेव

वामन मूर्ती महान कीर्ती

वस्ती तिथे मस्ती

वरून साखर पेरणी, आतून कसाबकरणी

वाटी त्याला घाटी

वेळ नाही वखत बसला खोकत

वाघ म्हटलं तरी खातो, मग वाघ्या का म्हणू नये

वरून कीर्तन आतून तमाशा

वेडयांचा बाजार मूर्खाचा शेजार

वय झालं सोळा भुंगे झाले गोळा

वास देवाला घास गुरवाला

वरच्यास हात खालच्यास लाथ

वाघाच्या घरी शेळी पाहुणी

## श

शितावरून भाताची परीक्षा

शुध्द बीजापोटी फळे रसाळ गोमटी

शेजीचं घेणं सवाई देणं

श्रीमंताचे जळू नये घर नि गरीबाची मरू नये बायको

शेजारणीनं लाटलं कसंनुसं वाटलं

शेजीनं दिली भाजी नको म्हटलं तर तिची नाराजी

शेजारणीच्या मांडवात सुनेची माया

शेजारणीच्या भाजीत झाला बिघाड तरी खाताना म्हटलं पाहिजे लई ग्वाड

शाबास रे वाघा तुझी चुलीपुढे जागा

शिंक्याचे तुटले बोक्याचे फावले

शिळ्या कढीला ऊत

शुभ बोले रे नाऱ्या तर म्हणे घराला लागली आग

शेळी जाते जिवानिशी खाणारा म्हणतो वातड कशी

शिमगा सरला कवित्व राहिले

शहाणपण गेले नको ते नशिबी आले

शेंडी तुटो पारंबी तुटो

शेणातले किडे शेणातच मरणार

शुभस्य शीघ्रम अशुभस्य काल हरणं

शिंगं मोडून वासरात शिरणे

शिर सलामत तो पगडी पचास

शेजीनं दिला दही भात आईनं फिरवला पाठीवरून हात

शब्दाचा सिंधू अकलेचा बिंदू

शक्ती तिथे भक्ती

शंभर गेले पाच राहिले

शिकला पण शाणा झाला नाही

शेरास सव्वा शेर

शठं प्रति शाठ्यं

शहाण्याला शब्दाचा मार तर मूर्खाला खेटराचा मार

शेवट गोड तर सर्व गोड

शरम करते नरम भ्रम करतो गरम

शहाण्याचे खावे जोडे, पण मूर्खाचे खाऊ नये पेढे

शान आहे तर मान आहे

शेजीचे घेणे सवाई देणे

शेजारणीचे देणे थोडे, मनाची भूक वाढे

शेजीने दिलेलं पुरेना, देवानं दिलेलं सरेना

शेजी घरी गोकूळ जीव माझा व्याकूळ

शेजीचा भात आईचा हात

शेजारणीची कढी धावून धावून वाढी

शेजारणीच्या घरी डुमडुम वाजे, कुंकवासाठी कपाळ खाजे

शंभर सुगरणी भात आळणी

शहाण्याचा होऊ नये धनी, मूर्खाचा होऊ नये चाकर

# <u>स</u>

सरशी तिकडे पारशी

साधी राहणी उच्च विचारसरणी

साखरेचं खाणार त्याला देव देणार

सरकारी काम सहा महिने थांब

सुख पाहता जवापाडे दुःख पर्वताएवढे

सून करते मांडे सासू लावते धांडे

सारखी खायची आग अन मेल्या मागं लाग

सत्तेपुढे शहाणपण चालत नाही

सुखदुःखा समैकृत्वा लाभालाभौ जयो जयः

संगती संग दोषः

सुंठीवाचून खोकला गेला

साठी बुध्दी नाठी

सासू मेली उन्हाळ्यात सून रडते पावसाळ्यात

सोनार शिंपी कुलकर्णी आप्पा यांची संगत नको रे बाप्पा

सोनाराने कान टोचलेले बरे असतात

सुटली सुगी न बसली उगी

संसाराला भारी अन जोडव्या काकणाला पैसे सारी

साधुसंत येती घरा तोचि दिवाळी दसरा

सापडला तर चोर नाही तर पाचाह्न थोर

सारा गाव मामाचा एक नाही कामाचा

सरडयाची धाव कुंपणापर्यंत

सांगितल्या कामाचा दिल्या भाकरीचा

स्वस्त आणि मस्त

समोरचं ताट द्यावं पण बसता पाट देऊ नये

सांगकाम्या कर नाम्या

सोने वेचले तेथे गोवऱ्या वेचू नयेत

सोन्याची सुरी नको घालू उरी

सटवाईला मिळेना नवरा अन म्हसोबाला मिळेना बायको

सासू सटवी तर सून नटवी

संन्याशाच्या लग्नाला शेंडीपासून सुरवात

स्त्रियश्चरित्रं पुरूषस्य भाग्यम

सासरी शिवरात्र माहेरी नवरात्र

स्मशान वैराग्य आणि प्रसूती वैराग्य जास्त काळ टिकत नाही

सुसरबाई तुझी पाठ मऊ

सुळावरची पोळी

सुरतेत जेवावे काशीला मरावे

सुतावरून स्वर्गाला गाठणे

सासू मेली बरं झालं घरदार हाती आलं

संसार केला बारीक आणि हेपलून गेला वारीक

सुक्याबरोबर ओले जळते

सुतासाठी मणी फोडू नये उंदीर झाले म्हणून घर पेटवू नये

सूर्यापोटी शनैश्चर

सगळेच मुसळ केरात

सरडयाची धाव कुंपणापर्यंत

सुपाचा वारा लेकी होती बारा

सोळावं वरीस धोक्याचं

समुद्रात राहून कोरडा

स्नान करून पुण्य घडे तर पाण्यात बेडूक काय थोडे

स्मशानी बसावे पण एकटे नसावे

सजीवं दहते चिंता निर्जीवं दहते चिता

सासू चढवते लेकाला, सून पढवते नवऱ्याला

सरासरी गुडघाभर पाणी

सवत साहीना, अन पोरगं होईना

सगळे सारखेच, इथून ओवावे तिथून काढावे

समानशीले व्यसनेषु सख्यम

सदा सत्य बोला यथा तथ्य चाला

सत्यमेव जयते

सत्यं शिवं सुंदरम

सर्वाचे पाय मातीचे असतात

सर्वे गुणां कांचनं आश्रयंते

सोन्याहून पिवळे

सोन्याला सुगंध

स्वयंपाक येईना ओली लाकडे

सत्पात्री दान महापुण्य

सुंभ जळला, तरी पीळ सुटत नाही

सात सुगरणी भाजी आळणी

साप म्हणून भुई धोपटणे

संकट काळी बुध्दी पांगळी

स्वार्थ तिथे परमार्थ

सापाला दूध पाजले, तरी तो विषच ओकणार

सात हात ढलपी नऊ हात लाकूड

सोय जाणील तो सोयरा

सोयऱ्यात साडू पंगतीत लाडू

सापडला तर चोरटा नाहीतर भुरटा

सतीला गती अन संन्याशाला मोक्ष

सांगायला नाही वर्म काय सांगू कर्म

सर घोडया पाणी खोल

सख्या सासूचा कापला कान, मावस सासू मागते मान

स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी

संगत चांगली पंगत रंगली

स्मशानात गेलं सरपण, हाती घेतलं दर्पण

सोंग सजवलं दारी निजवलं

सहज पडे दंडवत घडे

सतरा कारभारी अन जो तो पायखोरी

सांगोसांगी वडाला वांगी

सुतासाठी मणी फोडू नये

संसाराचं कोडं जे जे करीन ते ते थोडं

सवत पाहून रंटगार, शेजार पाहून संसार

## <u>ह</u>

हे विश्वचि माझे घर

हसा आणि लठ्ठ व्हा

हातचं सुटेना बाजारातून उठेना

हा सूर्य हा जयद्रथ

हातून सुटला पोलिसला भेटला

हत्ती गेला शेपूट राहिले

हसतील त्याचे दात दिसतील

हात फिरे तिथे लक्ष्मी वसे

हिरा तो हिरा गार ती गार

हलवायाच्या घरावर तुळशीपत्र

हत्तीच्या पायाने येते आणि मुंगीच्या पावलाने जाते

हटी जेवण मठी निद्रा

हसतमुखी सदासुखी

हात पाय काडया पोट वाढया

होणार होईल न चुके, येई जरी ब्रम्ह तया आडवा

हाय बी गेलं हुय बी गेलं

होणारे होईल, न चुके येईल जरी ब्रह्म तया आडवा

हात फिरे तिथे लक्ष्मी वसे

हात पाय लुळे जीभ चुरूचुरू चाले

हातून होईना काही, तोंड घेतं घाई

हात ओला तर साजण भला

हात लावीन त्याचं सोनं करीन

हाती नाही आणा मला पाटील म्हणा

हात दाखवून अवलक्षण

हातच्या काकणाला आरसा कशाला

हपापाचा माल गपापा

हातचं सोडून पळत्याच्या मागे

हाती कवडी विद्या दवडी

हात गोड नाही तर हाट गोड

हातून होईना काही तोंड घेतं घाई

हाती काम मुखी नाम

हौसेने केला पती, त्याला झाली रगतपीती

हत्तीचे दात मागे नाही जात

हरदासाची कथा मूळपदावर

हत्तीचं खाणं दिसतं पोट दिसतं नाही

हात ओला तर साजण भला

हात फिरे तिथे लक्ष्मी वसे, अन तोंड फिरे तिथे अवदसा फिरे

हाती भाला जेवू घाला

हाती पायी चाळा, बोल लावी कपाळा

हातपाय हाले त्याचे दैव चाले

हाती आला ससा तो गेला कसा

हातपाय दमले किती करू बायले

हातात रोकडा उडवतो छकडा

हातावर साखर गळ्यावर कातर

हातात नाही चवली लग्न करायला धावली

हाती सोंगय्या फासे दैव त्याला हासे

हुरळली मेंढी लागली लांडग्याच्या मागे

## **ळ, क्ष, ज्ञ**

ज्ञानियांच्या घरा बुध्दिवंतांच्या येरझारा